# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

**परिपत्रक क्र. आस्था/आरओ/४६/२०२६**

या परिपत्रकाद्वारे सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुखांना कळविण्यात येते की, कंत्राटदार मे. आस्था स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित, धुळे यांच्यामार्फत विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक व प्रशासकीय विभागात कार्यरत कुशल आणि अकुशल कंत्राटी कामगारांचे हजेरीपत्रक प्रमाणित करुन देतांना खालीलप्रमाणे कार्यवाही करुनच हजेरीपत्रक प्रमाणित करुन सादर करावेत.

०१) या पूर्वी वेळोवेळी कळविण्यात आल्यानुसार (परिपत्रक क्र. ९१, दि. ११-०३-२०२५) विभागातील कंत्राटी कामगारांचे हजेरीपत्रक दर महिन्याच्या पाच तारखेच्या आत कंत्राटदार यांना साक्षांकित करुन द्यावे.

०२) बायोमेट्रीक उपस्थिती अहवाल प्रमाणित करुन देतांना विभागप्रमुखांनी बायोमेट्रीक उपस्थितीनुसार संबंधित कंत्राटी कामगार विभागात पूर्णवेळ उपस्थित होता असे प्रमाणित करुन दिल्यानंतरच सदरील उपस्थिती अहवाल ग्राह्य धरण्यात येईल.

०३) परिपत्रक क्र. आस्था / आरओ / ८७ / २०२५, दि. १८-०२-२०२५ अन्वये बायोमेट्रीक उपस्थिती अहवालावर कोणतीही खाडाखोड करु नये. बायोमेट्रीक उपस्थिती नसल्यास त्या दिवसाची हस्तलिखित हजेरी ग्राह्य धरली जाणार नाही व त्या दिवसाचे वेतन अदा करण्यात येणार नाही.

०४) विभागातील एखादा कंत्राटी कामगार विनापरवानगी / पूर्व सूचना न देता अनुपस्थित असल्यास त्याच्या अनुपस्थितीबाबत विभागप्रमुखांनी स्पष्ट अभिप्राय हजेरीपत्रकावर नमूद करावा, विभागप्रमुखांनी कोणताही अभिप्राय न दिल्यास संबंधित कामगारास प्रशासकीय मान्यतेशिवाय रुजु करुन घेण्यात येवू नये. प्रशासकीय मान्यता नसतांना रुजु करुन घेतल्यास त्यांची आर्थिक व प्रशासकीय जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांची राहील. विना परवानगी कंत्राटी कामगार अनुपस्थित असल्यास त्याची माहिती तात्काळ कंत्राटदार तसेच कुलसचिव कार्यालयात सादर करावी. अन्यथा सदरील कामगारास कामावरुन कमी केले जाईल.

०५) विभागप्रमुखांनी बायोमेट्रीक अनुपस्थिती असतांना उपस्थित असल्याचे प्रमाणित करुन दिल्यानंतर लेखा विभागामार्फत त्रुटी दर्शविण्यात येते. त्यामुळे बायोमेट्रीक उपस्थिती नसलेल्या कामगारांची उपस्थिती विभागप्रमुखांनी हस्तलिखित दर्शवू नये, तसे दर्शविल्यास ती अनुपस्थिती ग्राह्य धरुन त्या दिवसाचे वेतन अदा करण्यात येणार नाही.

०६) ज्या विभागांच्या कार्यालयीन वेळा या विद्यापीठाच्या नियमित वेळेपेक्षा भिन्न व शिफ्टनुसार आहेत. याबाबत सर्व संबंधित विभागांनी विभागातील कामगारांच्या कार्यालयीन वेळा हजेरीपत्रकावर नमूद करुन सादर करण्याबाबत दि. १७-१२-२०२५ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधित विभागप्रमुखांना कळविण्यात आले असून त्याप्रमाणे सर्व विभागांनी कार्यालयीन वेळा भिन्न व शिफ्टनुसार असेल तर त्याचे आदेश हजेरीपत्रकासोबत जोडून सादर करावेत. जेणेकरुन त्या वेळेनुसार कंत्राटी कामगारांचे वेतन अदा करणे सोईचे होईल.

०७) विभागाची कार्यालयीन वेळ शिफ्ट नुसार / नाईट शिफ्ट असतांना संबंधित कामगाराची एक वेळचीच बायोमेट्रीक उपस्थित असल्यास विभागप्रमुखांनी संबंधित कामगाराचे एकूण उपस्थित दिवस स्पष्ट नमूद करुन सादर करावे. अन्यथा असे एक वेळेचे बायोमेट्रीक उपस्थितीचे हजेरीपत्रक स्वीकारले जाणार नाही व त्यांची त्या दिवसाची अनुपस्थिती ग्राह्य धरुन वेतन अदा करण्यात येणार नाही.

०८) विद्यापीठ उद्यान विभागातील कामगारांना बदली सुट्टी देण्यात येत असल्यामुळे उद्यान विभागातील कामगारांच्या बदली सुट्टीचा स्वतंत्र तक्ता हजेरीपत्रकासोबत सादर करावा.

सबब, सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुखांना कळविण्यात येते की, कंत्राटी कामगारांचे हजेरीपत्रक प्रमाणित करुन सादर करतांना उपरोक्त सूचनांन्वये काटेकोरपणे कार्यवाही करुनच हजेरीपत्रक प्रमाणित करुन सादर करावे.

विद्यापीठ प्रांगण, छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००४. )(
संदर्भ :- आस्था/आरओ/४६/२०२६ )(
दिनांक :- १६-०२-२०२६ )(

**कुलसचिव**

**या परिपत्रकाची प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव:-**

१) संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसर, धाराशिव.

२) सर्व संचालक/विभागप्रमुख, शैक्षणिक व प्रशासकीय विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

३) संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात यावे.

४) मे. आस्था स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित, धुळे.

*****